ISSN 2319-8648
UGC Approved Journal Sr. No. 64310
Impact Factor - 2.143
Peer-Reviewed
Indexed (IIJIF)

# Current Global Reviewer

Estd. June 1979

*Issue I, Volume I*

*Special Issue*

*on*

"Above Self... Above Politics"

# Contemporary Social and Educational Issues in India

*On the Occasion of Centenary Celebration of Gokhale Education Society*

*(20th March, 2018)*

*by*

## Gokhale Education Society

*Mumbai Zone, Mumbai*



**Editor in Chief**
**Mr. Arun Godam**

**Speical Editor**
**Dr. Mrs. S. V. Sant**

**Co-Editor**
**Dr. R. P. Deshpande**
**Mr.P. K. Mishra**

**Co-Edior**
**Dr. S. B. Karande**
**Mr. S. R. Uchale**

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | My Golden Experience with Gokhale Education Society | M. K. Chaube | 1 |
| 2 | Education in 21st Century | Dr. Mrs. Indira Shukla | 4 |
| 3 | Environmental Education For Sustainability | Mrs. Kalpana Gawde | 7 |
| 4 | Education in 21st Century: Challenges & Need of the Hour in Indian Context | Miss. Suhas R Sawant | 17 |
| 5 | Education in 21st Century | Ms. Archana R.Vartak | 22 |
| 6 | Media and Gender Stereotype | Mrs. Sushila Yadav | 26 |
| 7 | Role of Gokhale Education Society in Present Era | Mr. Jondhale Valmik R. | 31 |
| 8 | Learning in 21st Century | Ms. Ritika Tejwani | 32 |
| 9 | 21st Century Skills and the Teaching of English. | Ms. Mini Rajan | 37 |
| 10 | Role and Importance of School Libraries in Education | Mr Dhanaji N Lavate | 44 |
| 11 | शिक्षण आणि समाज विकास | दिपाली अ. पाठगबे | 49 |
| 12 | गोखले शिक्षण संस्थेची वाटचाल | सौ.मृण्मयी मनोज भुसाणे | 51 |
| 13 | २१ व्या शतकातील "शिक्षणातील डिजिटलायझेशन" | पल्लावी सकपाळ | 55 |
| 14 | गोखले एज्युकेशन सोसायटीच्या शतकी वाटचालीवर एक नजर...... | प्रा. किशोर लहारे | 58 |
| 15 | Social Science in Digital Era | Prof. Pradipta Kumar Mishra | 63 |
| 16 | Psephological Study: An Epistemology toThrow Light on the Status of Political wareness in India | Dr. (Mrs.) Indrani Saha | 68 |


Copyright by © Shaurya Publication, Latur / Email- hitechresearch11@gmail.com / www.rjournals.co.in

# ११. शिक्षण आणि समाज विकास

दिपाली अ. पाठराबे
सहाय्यक प्राध्यापक, गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय,
ता. श्रीवर्धन जि.रायगड

---

शिक्षणाचे महत्व समाजात काय आहे? शिक्षण म्हणजे प्रगतीचे लक्षण. सर्व सामान्यांना समाजात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी प्रि. टी. ए. कुलकर्णी यांनी नामदार "गोपाळ कृष्ण गोखले" यांचा नावाने १९ फेब्रुवारी १९१८ रोजी " गोखले एज्युकेशन सोसायटीची" स्थापना केली.

"शिक्षणाचा तेजोगय प्रकाशाने
असानाचा दूर होइ अंधार
जसा मुळांचा वृक्षा असे आधार
शिक्षण मना घडवी सुसंस्कार"

संस्कार ही एक संकल्पना आहे. ती व्यक्तीचा उक्ती आणि कृतीमधुन व्यक्त होत असते. संस्कार म्हणजे काय? तर शिस्त, आदर्शमुल्य, जबाबदार नागरीक, विनम्रता, थोरामाठांचा आदर, कर्तव्य, माणुसकी, ज्ञानाचा योग्य वापर या सर्वाचे एक आदर्शवत स्वरुप संस्कारातुन प्रगट होते. स्वपासुन सुरु होणारा संस्कार कुटूंबाला, समाजाला, राष्ट्राला प्रगतीचा सर्वोच्च शिखरावर नेण्याचे कार्ये करतो, हे सुयोग्य संस्कार देण्याचे कार्ये विविध संस्थांचा माध्यमातुन होत असले तरी ही "गोखले एज्युकेशन सोसायटी" च्या माध्यमातून आणि विविध उपक्रमाचा माध्यमामुळे ते महाराष्ट्राला अग्रस्थानावर नेण्याचे कार्ये संस्था करीत आहे. त्यामुळे संस्थेचे नाव अग्रक्रमात आहे.

दिनांक १९ फेब्रुवारी २०१८ या दिवशी संस्थेचा शतकपुर्ती सोहळा साजरा करण्यात आला. या संस्थेतुन कवी "कुसुमाग्रज" यांनी शिक्षण घेतले तर नाटककार वसंत कानेटकर यांनी अध्यापन केले आहे. नाशिक, पालघर, मुंबई, रायगड या जिल्हात संस्थाचा विस्तार झालेला आहे. त्यामधून लाखो विदयार्थी ज्ञान व कौशल्य यांचे शिक्षण प्राप्त करित आहे.

कृषीक्षेत्रातील भरीव कामगिरी बद्दल संस्थेचा केन्द्र सरकारचा "दीनदयाळ उपाध्याय" पुरस्कार प्रदान करुन गौरव करण्यात आला आहे. विदयार्थी प्रवेशासाठी या संस्थेच्या महाविदयालयांना प्रथम पसंदी क्रम देतात. ज्ञानात्मक अध्यापण, तंत्रज्ञान व डिजीटल संसाधनांचा वापर करुन परिणामकारक शिक्षण देण्यात येते. तसेच विविध क्षेत्रात

विदयार्थींना मार्गदर्शन करण्यात येते. देशाची भावी सक्षमपीढी उभारण्याचे, सुयोग्य व संस्कृत नागरीक घडविण्याचे, त्याच प्रमाणे विदयार्थ्यांना योग्य दिशा व प्ररणा देण्याचे कार्ये करुन समाजहीताचे व राष्ट्रहीताचे पवित्र कार्ये संस्थेच्या माध्यमातुन करण्यात येते.

माणसाचा विकास व समाजाची प्रगती, आपल्या परिसरात झालेल्या सुधारणा व विकास यातून समाजाचा सकारात्मक बदल घडत असतो. त्यात शैक्षणिक संस्थेचे योगदान हे बहुमूल्य ठरते. अशात "गोखले एज्युकेशन सोसायटी" ज्ञानरुपी "दिपस्तंभाची" भूमिका बजावतो.

माणूस जसा व्यक्ती म्हणून प्रगत होत जातो. तसा तो समाजाचा उन्नतीचा घटक असतो म्हणून त्याचा व्यक्तीगत विकासापेक्षा समाजाचा व राष्ट्राचा विकास होणे अधिक महत्वाचे आहे. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते.

"चल माणसा आरंभ कर

ध्येय तुझे निश्चित कर
शिक्षणाची कास धरुनी
समाजाची प्रगती कर."